दै. गोदातीर दि. 05.02.2025

# विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी शिक्षकास तीन वर्षे तुरुंगवास

बिलोली (प्रतिनिधी)- [illegible] मुलीस वाईट हेतुने त्रास देऊन तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी येथील जिल्हा न्यायाधीश-१ तथा अति. सत्र न्यायाधीश दिनेश ए. कोठलीकर आरोपी राजेश देविदास कागळे या शिक्षकास दि. ४ फेब्रुवारी रोजी तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

बिलोली शहरातील गांधीनगर भागातील पिडीत मुलगी इयत्ता १० वीच्या शिकवणी वर्गासाठी राजेश देविदास कागळे या शिक्षकाकडे जात होती. शिकवणीस जात असताना सात ते आठ महिन्यांपासून शिकवणी वर्गाचे शिक्षक कागळे हा वाईट उद्देशाने पिडीत मुलीच्या पाठीवरून हात फिरवणे, गाल पकडणे यासोबतच तुमच्या गणित आणि विज्ञानाचे प्रॅक्टिकल चे मार्क माझ्या हातात आहेत असे म्हणून धमकावत होते. तशी तक्रार पिडीत मुलीने तिच्या वडिलांकडे केली होती. त्यानंतर सुद्धा कागळे आरोपी शिक्षकाने पिडीत मुलीला शिकवणी वर्गामध्ये नेहमी टॉन्ट मारून मानसिक त्रास देत होता. अशातच दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी पिडीत मुलीचे आई वडील बाहेरगावी गेले असताना सकाळी अंदाजे दहा ते दिड वाजताच्या सुमारास पिडीत मुलगी शिकवणी वर्गास गेली असता आरोपी शिक्षक राजेश कागळे याने तिला वाईट हेतुने मनाला वेदना होतील असे शब्द बोलले. त्यामुळे पिडीत मुलीने त्रासाला कंटाळून चिठ्ठी लिहून स्वतः च्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, अशी फिर्याद पिडीत मुलीच्या वडिलांनी बिलोली पोलीस स्थानकात दिली.

फिर्यादी नुसार पोलिसांनी गुन्हा क्रं. २५/२०१७ नुसार गुन्हा दाखल करून तपास केला. या गुन्ह्याचा तपास पुर्ण करून जिल्हा व अति. सत्र न्यायालय बिलोली येथे दोषारोप पत्र दाखल केले. यात ९ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षी पुराव्यांचा विचार करून जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश दिनेश ए. कोठलीकर यांनी दि. ४ फेब्रुवारी रोजी आरोपी शिक्षक राजेश देविदास कागळे यास कलम ३०५- भा.दं.वी अंतर्गत दोषी ठरवून तीन वर्ष सश्रम कारावास व २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणी सरकार पक्षातफ सहाय्यक सरकारी अभियोक्ता संदिप कुंडलवाडीकर यांनी बाजु मांडली. त्यांना तपासिक अंमलदार एस. एस दळवी व पैरवी अधिकारी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख महेबुब शेख अहेमद हुसेन यांनी सहकार्य केले.